दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358 | सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. ०६ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## घराची बेकायदेशीरपणे झडती; 10 हजार रुपये नुकसान भरपाई

**नागपूर :** खापा पोलिसांनी तपासाच्या नावाखाली बेकायदेशीरपणे घराची झडती घेऊन मोबाईल जप्त केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पीडित महिलेला १० हजार रुपये नुकसान भरपाई मंजूर केली. न्यायमूर्तिद्वय उर्मिला जोशी-फलके व निवेदिता मेहता यांनी पोलिसांची कारवाई मनमानी ठरवत हा निर्णय दिला. भरपाईची रक्कम अदा करण्यासाठी राज्य सरकारला दोन महिन्याची मुदत देण्यात आली आहे.


## पाहिजेत

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


## थोडक्यात वार्ता

### शकुंतला नहार यांचे निधन; अनाथांचा मायेचा आधार हरपला



**पुणे :** पुण्यातील सामाजिक कार्यात नेहमीच हिररीने सहभागी होणाऱ्या आणि अनाथ मुलांसाठी हक्काचा आधार ठरलेल्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या शकुंतला हमीरमल नहार (वय ८७) यांचे रविवारी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. शहरातील प्रतिष्ठित व्यापारी आणि 'रॉयल डायमंड'चे पार्टनर अशोक नहार यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने नहार परिवारावर शोककळा पसरली असून, एका दानशूर आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचा अंत झाल्याची भावना व्यक्त होत आहे. गेल्या काही दिवसांपासून शकुंतला नहार यांच्यावर शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, उपचार सुरू असतानाच रविवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात मुलगा अशोक नहार, मुलगी मीना सुंदेचा, सून, जावई आणि नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

### साडेतीन वर्षांच्या मुलाला गरम उलथण्याने दिले चटके आईने वर गुन्हा दाखल

**ठाणे :** आई आणि मुलाच्या नात्याला मायेचे प्रतीक मानले जाते. मात्र ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरात घडलेल्या एका घटनेने अनेकांना धक्का बसला आहे. किसन नगर भागात साडेतीन वर्षांच्या मुलावर त्याच्याच आईने अमानुष अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला असून पोलिसांनी संबंधित महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलाने आपल्या आजीकडे आईकडून होणाऱ्या मारहाणीची माहिती दिली. तसेच गरम उलथण्यानं हात-पायांवर चटके दिल्याचेही त्याने सांगितले. हे ऐकून आजीने तातडीने त्याला घेऊन स्थानिक शिवसेना मध्यवर्ती शाखेत धाव घेतली. बालकाच्या अंगावरील जखमा पाहून उपस्थितांनाही धक्का बसला. त्यानंतर शाखाप्रमुख सुनील मोरे यांनी वेळ न दवडता मुलाला जवळच्या रुग्णालयात दाखल केले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

### नातवाच्या मृत्यूचा धक्का असह्य; आजीचेही निधन

हिंदू प्रकाशवार्ता | प्रतिनिधी





**अंधारी दि. ५ जुलै :** सिल्लोड तालुक्यातील दिडगाव येथे घडलेल्या अत्यंत हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. १८ वर्षीय नातू हर्षल कैलास शेजुळ याच्या निधनाची बातमी समजताच त्याची आजी पार्वताबाई शंकर शेजुळ यांना तीव्र धक्का बसला. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली.

एकाच कुटुंबातील अल्पावधीत झालेल्या दोन निधनांमुळे शेजुळ कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून दिडगाव गावातही हळहळ व्यक्त होत आहे. हर्षलच्या अकस्मात मृत्यूची नोंद सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पो. ह. राजेंद्र काकडे करीत आहेत. दरम्यान, नातवाच्या निधनाचा धक्का सहन न झाल्याने आजीचाही मृत्यू झाल्याची चर्चा गावात असून, त्यांच्या निधनामुळे शेजारी, नातेवाईक आणि ग्रामस्थांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. एकाच घरातील दोन व्यक्तींच्या निधनाने संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून शेजुळ कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

### "शाल जोडे"




# महायुतीची बाजी : जिल्हा बँक संचालक मंडळावर 2 मंत्री, 1 खासदारासह 5 आमदारांचे वर्चस्व

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीचा निकाल अखेर स्पष्ट झाला असून, जिल्ह्यातील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या या निवडणुकीत अखेर जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. नवनिर्वाचित संचालक मंडळात २ मंत्री, १ खासदार आणि ५ आमदारांची एन्ट्री झाल्याने बँकेचे हे संचालक मंडळ अत्यंत वजनदार आणि चर्चेचे ठरले आहे. निकालाची घोषणा होताच कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत आणि फटाक्यांची आतषबाजी करत जोरदार जल्लोष केला. या निवडणुकीत महायुतीच्या 'शेतकरी विकास पॅनल'ने सुरुवातीलाच अत्यंत यशस्वी खेळी करत आपल्या २० पैकी ७ जागा बिनविरोध निवडून आणल्या होत्या. त्यामुळे महायुतीने निवडणुकीआधीच मोठी आघाडी घेतली होती. दुसरीकडे, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि इतर घटक पक्षांच्या महाविकास आघाडीच्या 'भूमीपुत्र शेतकरी बचाव पॅनल'चा १ संचालक बिनविरोध आला होता. अशा प्रकारे एकूण ८ संचालक आधीच बिनविरोध निवडून आले होते. २१ जागांपैकी ८ जागा बिनविरोध झाल्या होत्या, तर उर्वरित १२ जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीच्या निकालाने जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर राजकीय नेत्यांची पकड किती मजबूत आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. आता जिल्हा बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### 99 टक्के मतदानानंतर चुरशीची लढत

उर्वरित जागांसाठी शनिवारी, ४ जुलै रोजी अत्यंत चुरशीने मतदान पार पडले. जिल्ह्यातील १०५३ मतदारांपैकी तब्बल १०४८ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. ९९ टक्के एवढ्या विक्रमी मतदानानंतर आज सकाळी मतमोजणीला सुरुवात झाली. गंगापूर, सोयगाव, कन्नड, छत्रपती संभाजीनगर या चार तालुक्यातील ४ जागा, बिगर शेती मतदारसंघाच्या ५ जागा, २ महिला राखीव आणि १ इतर मागासवर्गीय (OBC) अशा एकूण १२ जागांसाठी ३१ उमेदवार रिंगणात होते. आज जाहीर झालेल्या निकालात दिग्गज नेत्यांनी बाजी मारली.

### संचालक मंडळातील 'दिग्गज' चेहरे:

संजय शिरसाट (पालकमंत्री) – बिनविरोध, अतुल सावे (कॅबिनेट मंत्री) – विजयी, डॉ. कल्याण काळे (खासदार) – विजयी, अंबादास दानवे (आमदार) – विजयी, रमेश बोरनारे (आमदार) – बिनविरोध, विलास भुमरे (आमदार) – बिनविरोध, अनुराधा चव्हाण (आमदार) – विजयी, संजना जाधव (आमदार) – विजयी.

# श्रीराम मंदिर देणगीतील कथित अपहाराविरोधात शिवसेना रस्त्यावर

## संभाजीनगरात घंटानाद आंदोलनाने सरकारवर निशाणा

हिंदू प्रकाशवार्ता: प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** अयोध्या येथील श्रीराम मंदिराच्या देणगीतील कथित अपहाराच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने रविवारी राज्यव्यापी 'श्रीराम रक्षा घंटानाद' आंदोलन छेडले. त्याचाच एक भाग म्हणून छत्रपती संभाजीनगरातील गुलमंडी येथील सुपारी हनुमान मंदिरात शिवसेना नेते तथा विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली घंटानाद, सामूहिक महाआरती, हनुमान चालीसा पठण आणि भजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

शेकडो शिवसैनिक, महिला पदाधिकारी आणि रामभक्तांच्या उपस्थितीत मंदिर परिसर 'जय श्रीराम', 'सियावर रामचंद्र की जय' आणि श्रीराम मंदिर देणगीतील कथित अपहाराचा निषेध करणाऱ्या घोषणांनी दणाणून गेला. श्रद्धेच्या पैशाचा गैरवापर सहन केला जाणार नाही, असा इशारा आंदोलनातून देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक हनुमान चालीसा पठणाने झाली. त्यानंतर श्रीगणेश, भगवान शंकर-पार्वती, श्री विठ्ठल-रुक्मिणी आणि प्रभू श्रीराम यांच्या महाआरत्या करण्यात आल्या. महिला आघाडीच्या जिल्हा संघटक आशा दातार यांच्या मार्गदर्शनाखाली आदेश, शिव पार्वती, रामेश्वर, शिव भक्ती आणि जानकी महिला भजनी मंडळांनी सादर केलेल्या भजने, अभंग आणि गवळणींमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

कार्यक्रमाच्या समारोपाला सर्व उपस्थितांनी हातात घंटा घेऊन जोरदार घंटानाद करत श्रीराम मंदिर देणगीतील कथित अपहाराचा निषेध नोंदविला. यावेळी बोलताना आमदार अंबादास दानवे यांनी श्रीराम मंदिराच्या देणगीतील प्रत्येक रुपयाचा हिशेब जनतेसमोर मांडावा, कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली.

# मानखुर्दमध्ये चाळीचा भाग कोसळला, पाच जण अडकल्याची शक्यता



**मुंबई :** मुंबईत सतत पडत असलेल्या पावसामुळे मानखुर्दमध्ये एक मोठी दुर्घटना झाली आहे. मुंबईच्या पूर्व उपनगरांतील मानखुर्दच्या जनता नगरमध्ये हनुमान मंदिराजवळ ही दुर्घटना झाली. चाळ क्रमांक पाचचा काही भाग सततच्या पावसामुळे कोसळला. मानखुर्दमध्ये झालेल्या या दुर्घटनेत किमान पाच जण ढिगाऱ्यात अडकले असल्याची भीती व्यक्त होत आहे. घटनास्थळी मुंबई महापालिका, पोलीस आणि अग्निशमन दल मदतकार्यात गुंतले आहे. १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकाही पोहोचल्या आहेत. अद्याप कोणी जखमी किंवा मृत असल्याचे वृत्त आलेले नाही. मदतकार्य वेगाने सुरू आहे. पडझड झाल्यामुळे कोसळलेला चाळीचा ढिगारा उपसण्याचे काम सुरू आहे. तळमजला अधिक तीन मजले अशा स्वरुपाची चाळ होती. या चाळीचा काही भाग कोसळला आहे. दुर्घटना होण्यामागचे नेमके कारण जाणून घेण्यासाठी मदतकार्य पूर्ण होताच तज्ज्ञांचे पथक चौकशी करणार आहे.

**शाळांना सोमवारी सुटी जाहीर**

भारतीय हवामान विभागाने (IMD) मुंबईसह ठाणे, नवी मुंबई, पनवेल महापालिकेच्या हद्दीतील शाळांना सोमवार ६ जुलै २०२६ रोजी सुटी जाहीर केली आहे. मुसळधार पावसाची शक्यता असल्यामुळे प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून शाळांना सुटी देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व शासकीय, खासगी, महानगरपालिका शाळा तसेच महाविद्यालयांना ही सुटी लागू आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आला असून, पावसामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी घराबाहेर पडू नये, असे प्रशासनाने सांगितले आहे. शाळा, महाविद्यालयांना सुटी असली तरी शासकीय आणि खासगी कार्यालये सुरू राहणार आहेत. कर्मचाऱ्यांना नियमितपणे कामावर हजर राहावे लागणार आहे. मुंबईसह आसपासच्या शहरांमध्ये दिवसभर मुसळधार पावसासह जोरदार वारे वाहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे काही ठिकाणी झाडे कोसळण्याच्या आणि फांद्या तुटण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना विशेष सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अत्यावश्यक काम असेल तरच घराबाहेर पडावे. समुद्रकिनाऱ्यांपासून दूर राहावे. धबधबे, नदी, नाले, ओढे, विहिरी, तलाव येथे पोहण्यासाठी जाणे टाळावे; असे आवाहन प्रशासनाने नागरिकांना केले आहे.

# एटीएम फोडणाऱ्या आरोपी पोलिसाच्या जाळ्यात



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** शहरातील नवा मोंढा परिसरात झालेल्या युको बँक एटीएम फोडीचा घटनेचा तपास करत असताना परभणी स्थानी गुन्हा शाखा च्या पथकाने अंबाजोगाई येथे झालेल्या एटीएम पुढच्या प्रयत्नातील चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. हे आरोपी परभणी जिल्ह्यातील मानवत व पाथरी तालुक्यातील आहेत. संबंधितांना पुढील तपासासाठी अंबाजोगाई शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

अधिक माहिती अशी की परभणी शहरातील नवा मोंढा परिसरात असलेल्या युको बँकेचे एटीएम फोडून साडेपाच लाखाची रोकड लंपास करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास स्थानिक गुना शाखेचे पथक करत असतानाच या पथकाने अंबाजोगाई शहर येथे दोन जुलै रोजी एसबीआय बँकेचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न झाला होता चोरट्यांना पडण्याशिवाय पर्याय नव्हता व तिथून पळण्याचा प्रयत्न केला या चोरट्याने परभणीच्या पथकाने ताब्यात घेतले यामध्ये गणेश बालासाहेब काळे राजेश बाबासाहेब कांबळे विवेक बबन थारे मुंजाजी लक्ष्मण आरसड हे सर्व राहणार कोल्हा तालुका मानवत. परमेश्वर सोना भाऊ बनगर विष्णू नारायण भिसे झरी तालुका पाथरी येतील चोरट्यांचा सहभाग असल्याचे उघड झाले.

# आषाढी वारीत प्रथमच एअर ॲम्बुलन्स; वारकऱ्यांसाठी अत्याधुनिक आरोग्य कवच

## 'आरोग्यसंपन्न वारी' ॲप, 353 रुग्णवाहिका, 43 आयसीयू आणि 3,087 आरोग्य कर्मचाऱ्यांची सज्जता

हिंदू प्रकाशवार्ता: प्रतिनिधी



**मुंबई :** आषाढी वारीतील लाखो वारकरी भाविकांना अधिक सक्षम आणि तातडीच्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने यंदा प्रथमच गंभीर रुग्णांसाठी एअर ॲम्बुलन्सची सुविधा सुरू केली आहे. यासोबतच 'आरोग्यसंपन्न वारी' मोबाईल ॲप, ३५३ रुग्णवाहिका, ४३ आयसीयू सुविधा आणि ३,०८७ वैद्यकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून व्यापक आरोग्य यंत्रणा सज्ज करण्यात आली असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या आढावा बैठकीत आबिटकर म्हणाले की, वारकरी घरातून वारीसाठी निघाल्यापासून ते सुखरूप घरी परतेपर्यंत आवश्यक त्या सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. 'आरोग्यसंपन्न वारी' ॲप आणि 'वारी सहाय्य' उपक्रमामुळे पालखी मार्गावरील आरोग्य केंद्रे, उपचार सुविधा, रुग्णवाहिका आणि आपत्कालीन सेवांची माहिती वारकऱ्यांना तत्काळ मिळणार आहे.

यंदाच्या वारीसाठी पालखी मार्गावर ४३ ठिकाणी आयसीयू सुविधा, १५६ प्राथमिक उपचार केंद्रे, ३५३ रुग्णवाहिका, २१५ आरोग्यदूत, ३०२ तज्ज्ञ डॉक्टर आणि ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. पंढरपूरमध्ये २४ तास कार्यरत आयसीयू, महाआरोग्य शिबिर, अतिरिक्त आयसीयू कक्ष तसेच मोफत चष्मा वाटपाची सुविधाही उपलब्ध करण्यात आली आहे.

याशिवाय पालखी मार्गावरील पाणी स्रोतांचे निर्जंतुकीकरण, डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधक उपाययोजना, हॉटेल व ढाबा कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी, खासगी रुग्णालयांमध्ये १० टक्के खाटा राखीव ठेवणे, सर्व आरोग्य सुविधांचे डिजिटल मॅपिंग आणि व्यापक जनजागृती अभियानही राबविण्यात येणार आहे.


बैठकीपूर्वी मंत्री आबिटकर यांनी औंध जिल्हा सामान्य रुग्णालय, पालखी मार्गावरील मुक्कामस्थळे आणि पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयाला भेट देऊन आरोग्य व्यवस्थेची पाहणी केली.

# स्वामी विवेकानंद कॉलेजसमोर पुन्हा ड्रेनेज ओव्हरफ्लो; विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

## म.न.पा.च्या स्वच्छतेनंतरही समस्या कायम; दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर





**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील स्वामी विवेकानंद कॉलेजसमोरील मुख्य रस्त्यावर ड्रेनेजचे सांडपाणी पुन्हा एकदा थेट रस्त्यावर वाहत असल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. काही दिवसांपूर्वी महानगरपालिकेने संबंधित ड्रेनेज लाईनची स्वच्छता करून समस्या दूर केल्याचा दावा केला होता. मात्र, अल्पावधीतच पुन्हा ड्रेनेज ओव्हरफ्लो झाल्याने स्वच्छतेच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

कॉलेजमध्ये दररोज शेकडो विद्यार्थी ये-जा करत असतात. ड्रेनेजच्या सांडपाण्यामुळे विद्यार्थ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून पावसामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. रस्त्यालगतच खानावळ व वडापावचे दुकान असल्याने येथे विद्यार्थ्यांची नेहमीच मोठी गर्दी असते. अशा ठिकाणी सांडपाणी वाहत असल्याने अस्वच्छ वातावरण निर्माण झाले असून आरोग्याच्या दृष्टीनेही धोका वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी महानगरपालिकेने केवळ तात्पुरती स्वच्छता न करता ड्रेनेज लाईनमधील मूळ तांत्रिक बिघाड शोधून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. अन्यथा संसर्गजन्य आजारांचा धोका वाढू शकतो, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.

# ग्लोबल पासपोर्ट इंडेक्समध्ये भारत 125व्या क्रमांकावर

**नवी दिल्ली :** ग्लोबल पासपोर्ट इंडेक्स 2026 मध्ये भारताची घसरण झाली असून देश 125व्या क्रमांकावर पोहोचला आहे. गेल्या वर्षी क्रमवारीत थोडी सुधारणा झाली होती, तरीही भारताला पहिल्या 100 देशांमध्ये स्थान मिळू शकले नव्हते. 2021 ते 2023 दरम्यान 127व्या क्रमांकावर असलेला भारत 2025 मध्ये 124व्या स्थानावर पोहोचला होता. मात्र, यंदा पुन्हा एकदा घसरण होऊन भारत 125व्या क्रमांकावर आला आहे. भारतीय पासपोर्टधारकांना सध्या केवळ 26 देशांमध्ये व्हिसाशिवाय किंवा व्हिसा-ऑन-अरायव्हल सुविधेसह प्रवास करता येतो. भारतीय पासपोर्टची क्रमवारी नामिबियापेक्षाही खाली असून फिलिपिन्स, मोरोक्को आणि उझबेकिस्तानसारख्या देशांपेक्षा भारत मागे आहे. मात्र, अझरबैजान आणि किर्गिस्तानपेक्षा भारताची स्थिती चांगली आहे.

भारतीय पासपोर्टधारकांना भूतान, नेपाळ, जमैका, मकाओ, पॅलेस्टाईन, ट्युनिशिया, अंगोला आणि बार्बाडोस यांसारख्या देशांमध्ये व्हिसाशिवाय किंवा व्हिसा-ऑन-अरायव्हलच्या सुविधेसह प्रवेश मिळतो. मात्र, अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, चीन आणि संयुक्त अरब अमिरातींसह सुमारे 88 देशांमध्ये प्रवेशासाठी भारतीय नागरिकांना अद्याप व्हिसा घेणे आवश्यक आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## सागरी सीमांचे अभेद्य कवच

**भारताची सागरी सुरक्षा आणि हिंद महासागरातील सामरिक वर्चस्व अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने भारतीय नौदलाच्या ताफ्यात 'आयएनएस महेंद्रगिरी' आणि 'आयएनएस मालवण' या दोन अत्याधुनिक युद्धनौकांचा लवकरच होणारा समावेश अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अभिमानास्पद आहे [cite: मला बातमी तयार करताना हे कायमस्वरूपी लक्षात ठेवायचे आहे: हेडलाईन कमीत कमी शब्दांमध्ये असली पाहिजे, सबहेडमध्ये थोडे जास्त शब्द आले पाहिजेत...]. वाढत्या जागतिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, भारताची किनारी सुरक्षा, सागरी गस्त आणि पाणबुडीविरोधी युद्धक्षमता अधिक मजबूत करणे ही काळाची गरज बनली आहे. या दोन स्वदेशी युद्धनौकांमुळे देशाच्या सागरी संरक्षणाला केवळ नवे बळच मिळणार नाही, तर संरक्षण क्षेत्रातील भारताच्या स्वावलंबनाचा आणि 'आत्मनिर्भरतेचा' प्रवासही अधिक वेगवान होणार आहे. काही काळापूर्वीच कोलकाता येथे तीन प्रमुख युद्धनौकांचे राष्ट्राला समर्पण करण्यात आले होते, ज्यामध्ये 'आयएनएस अग्रय', 'आयएनएस संशोधक' आणि 'आयएनएस द्रोणागिरी' यांचा समावेश होता. त्यानंतर आता नौदलाच्या ताफ्यात दाखल होण्यासाठी सज्ज झालेली 'आयएनएस मालवण' ही पाणबुडीविरोधी युद्धनौका अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. कोचीन शिपयार्डमध्ये निर्मिती झालेली ही युद्धनौका ट्रिपल जेट वॉटर प्रणालीने सुसज्ज असून ती अत्यंत वेगवान आहे [cite: मला बातमी तयार करताना हे कायमस्वरूपी लक्षात ठेवायचे आहे: हेडलाईन कमीत कमी शब्दांमध्ये असली पाहिजे, सबहेडमध्ये थोडे जास्त शब्द आले पाहिजेत...]. आधुनिक रडार, हलक्या वजनाचे टॉर्पेडो आणि पाणबुडीविरोधी रॉकेट्स यांमुळे उथळ पाण्यात शत्रूच्या पाणबुड्यांचा अचूक वेध घेण्याची तिची क्षमता अजोड मानली जाते [cite: मला बातमी तयार करताना हे कायमस्वरूपी लक्षात ठेवायचे आहे:** हेडलाईन कमीत कमी शब्दांमध्ये असली पाहिजे, सबहेडमध्ये थोडे जास्त शब्द आले पाहिजेत...]. दुसरीकडे, मुंबईतील माझगाव डॉकमध्ये बांधण्यात आलेली 'आयएनएस महेंद्रगिरी' ही नीलगिरी श्रेणीतील अत्याधुनिक 'स्टेल्थ फ्रिगेट' म्हणजेच शत्रूच्या रडारवर सहजासहजी न दिसणारी युद्धनौका आहे. ब्रह्मोस क्रूझ क्षेपणास्त्रे, शक्तिशाली नौदल तोफ, वरुणास्त्र टॉर्पेडो प्रणाली आणि रॉकेट लाँचर्स यांनी सज्ज असलेल्या या जहाजावर प्रगत हेलिकॉप्टर तैनात करण्याचीही सोय आहे. शत्रूची जहाजे आणि पाणबुड्यांचा लांबूनच अचूक शोध घेण्याची क्षमता असणारी ही युद्धनौका भारतीय नौदलाची मारक क्षमता अनेक पटींनी वाढवणारी ठरणार आहे. हिंद महासागर क्षेत्रात सध्या वाढलेली आंतरराष्ट्रीय हालचाल आणि सागरी चाचेगिरीच्या धोक्यांमुळे भारताला आपली सागरी टेहळणी आणि आक्रमकता कायम ठेवावी लागत आहे. अशा वेळी संपूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानाने आणि भारतीय कंपन्यांनी तयार केलेल्या या युद्धनौका नौदलात येणे, हा भारताच्या तांत्रिक प्रगतीचा मोठा पुरावा आहे. संरक्षणासोबतच या जहाजांच्या निर्मितीमुळे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगार आणि उद्योगांनाही चालना मिळाली आहे. सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी आणि शत्रूच्या कोणत्याही आक्रमक मनसुब्यांना वेळीच हाणून पाडण्यासाठी भारतीय नौदल आता अधिक सक्षम बनले असून, या दोन युद्धनौकांचा समावेश देशाच्या सार्वभौमत्वाला अधिक सुरक्षित ठेवणारा ठरेल यात शंका नाही.

# आस्थेतही भ्रष्टाचार;पण वास्तविकता काय.?

राममंदिर हे केवळ आध्यात्मिक मंदिर नाहीये. ते सांस्कृतिक केंद्र आहे, ते श्रध्दा केंद्र आहे. ते भारताच्या मर्यादेची धरोहर आहे, ते राष्ट्रमंदिर आहे. पुराण पुरूशोत्तमाच्या मानवी चरित्राची जीवन पद्धती आहे. आणि अशा मंदिरात भ्रष्टाचार झालेला कोणताही सामान्य नागरिक खपवून घेणार नाही त्याने तो घेऊ सुद्धा नये. आपण पाहिलं असेल राम मंदिर हे अनेकांसाठी राजकीय केंद्र झालं होतं. अगोदरही आणि मूर्ती स्थापन झाल्यानंतर सुद्धा त्या विषयातलं राजकारण काही मंडळींनी केलंय. हाही विषय नाकारता येत नाही आणि या भ्रष्टाचाराच्या मागे त्या काही सुप्त शक्ती, आजही सक्रिय आहेत का.? असाही विचार करावा लागेल. कारण राम मंदिर हे भारतातल्या सर्वात मोठ्या राज्यातून येतो. त्यातच त्या ठिकाणी पुढील सहा महिन्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत त्यामुळे अशी शंका घ्यायला पुरेसा वाव आहे. आज ह्यांचं राजकारण करणाऱ्या मंडळी ह्या त्याच आहेत ज्यांनी, निधीला विरोध केला होता. ह्या राम मंदिराला एका पक्षाचा अजेंडा म्हणून त्यांनी आरोप केला होता. महाराष्ट्रात तर एक नेता म्हणाला "तुम्ही ज्याला जय श्री राम म्हणता ना, मी त्याला हरामखोरपणा म्हणतो" असं म्हणाला होता. केंद्राचा एक नेता आमंत्रण असूनही मूर्ती स्थापनेला गेला नाही. आणि आज सर्वात पुढे ह्याचं राजकारण करायला हीच मंडळी पुढे दिसते आहे. अर्थात ही मंडळी पुढे दिसतं आहे, तरी एक बाब जी निदर्शनास आली त्यावरून भ्रष्टाचार झाला हे सिद्ध होतं. कुण्या तरी जबाबदार व्यक्तींनी याची जबाबदारी देखील घेतलेली आहे. केलेला भ्रष्टाचार याला लपवण्याचं काहीही कारण नाही. आस्थेवर हा घातलेला घाव ज्याने कुणी घातला आहे, त्याला कठोरातली कठोर शिक्षा निश्चितच होईल आणि या सर्व विषयांमध्ये एक भाग मी प्रकर्षाने सांगू इच्छित आहे की ही बाब "श्रीराम मंदिर ट्रस्ट अयोध्या न्यास ह्यांनीच समोर आणलेली आहे" त्यामुळे संपूर्ण न्यासाला दोषी धरणे किंवा एखाद्या पक्षाला किंवा संघाला, विश्व हिंदू परिषदला दोषी धरणे ही अतिशय चुकीची बाब आहे ज्या माध्यमातून हे विषय समाजापुढे येत आहेत त्यात तथ्य अतिशय कमी. आणि राजकारण होतं आहे. त्या माध्यमातून राष्ट्र विरोधी शक्ती हा विषय चुकीच्या अफवा पसरून पुढे आणत आहेत...

राम मंदिर हे सभ्यतेचे प्रतीक आहे. पण मीडिया आणि राजकीय पक्षांनी ह्यातून जी असभ्यता प्रगट करीत आहेत हो कीसळवानी आहे. स्वतः न्यासानी हे प्रकरण कोर्टात नेले आहे ज्या अर्थी स्वतः न्यासानी हे प्रकरण कोर्टात नेले आहे याचा अर्थ असा आहे की न्यास या विषयात अतिशय पारदर्शक आहे. आपण बघितलेला आहे अनेक मंदिरांमध्ये भ्रष्टाचार चाललेले असतात हा नाकारण्याचा विषय नाहीये. परंतु ती भ्रष्टाचार विश्वस्त मंडळी आणि ट्रस्टीमंडळी ही एकमेकांच्या संगणमताने त्यावर आवरण घालत असतात पण न्यासाने ही प्रकरण स्वतःहून कोर्टासमोर आणलेला आहे. म्हणजे झालेल्या भ्रष्टाचाराला न्यासाने पाठीशी घातलेलं नाहीये, ही पारदर्शकतेच्या दृष्टीने सर्वात महत्वाची बाब आहे. ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आणि विश्व हिंदू परिषदने या मंदिरासाठी एक मोठा लढा दिला होता त्या परिषदेने आणि संघाने सुद्धा स्वतःची भूमिका अतिशय प्रामाणिकपणे आणि तितक्याच कठोरपणे स्पष्ट केलेली आहे की झालेल्या भ्रष्टाचाराची कठोरातली कठोर चौकशी होऊन संबंधित गुन्हेगारावर अतिशय जलद गतीने कार्यवाही व्हावी. पण ह्यावर काही लोकांचं समाधान



नाहीये. मुळात त्यांना समाधान न मानता केवळ हिंदू आणि राष्ट्र विरोधी शक्तीला ह्या माध्यमातून बळ द्यायचं आहे. जे की ते देत आहेत. त्यासाठी ते वाट्टेल ती अफवा देखील पसरवत आहेत. भ्रष्टाचार झाला हे मान्यच परंतु ज्या पद्धतीने त्या माध्यमातून अफवा पसरवत आहेत, ह्या अफवा राष्ट्रहितासाठी हिंदू म्हणून कधीही पोषक नाही.

आस्थेवर भ्रष्ट घाव घातला हे मान्य, परंतु सत्य परिस्थिती काय.? वास्तविकता नेमकी काय.? हे आपण जाणून घेतलं पाहिजे आणि त्यावर विचार केला पाहिजे. ह्यात एक अफवा नंबर एक अशी होत आहे की, अयोध्येतील जमीन खरेदी आणि विक्री यातही भ्रष्टाचार झाला आहे, पण वास्तविकता अशी आहे की त्या जमीन खरेदी आणि विक्रीची संपूर्णपणे कायदेशीर प्रक्रिया कोर्टामार्फत पूर्ण झालेली आहे. दुसरी अफवा अशी, की एवढी मोठी चोरी झाली मग अयोध्या न्यास काय करत होते.? त्यातील सत्यता अशी आहे की सदरल चोरी प्रकरण न्यासाच्या पुढाकारातूनच उघडकीस आले आहे. न्यासाने स्वतः कायदेशीररित्या तक्रार केली व न्यासाच्या तक्रारीवरूनच कार्यवाही सुरू झाली. तिसरी अफवा अशी आहे मंदिरातून भक्तांनी अर्पण केलेले दागिने, सोने, चांदी, चांदीच्या विटा ह्या सुद्धा गायब झाल्या आहेत. वास्तविकता अशी आहे केवळ पैशाची चोरी झाल्याचे समोर येत आहे चांदीच्या विटा, त्याचे दागिने, सोन्याचे दागिने अतिशय सुरक्षित असल्याचे न्यासाने नुसते स्पष्ट केले नाहीत, तर ते दाखवले सुद्धा आहेत. आणि चौथी अफवाशी ही चोरी मंदिराच्या पुजाऱ्यांनी केल्याचा दावा केलेला आहे. वास्तविक सत्य असा आहे चोरी पैसे मोजणाऱ्या कर्मचाऱ्यांनी केलेली आहे आणि त्यातून आठ संशयित कर्मचाऱ्यांना अटक करून त्याची चौकशी सुद्धा सुरू झालेली आहे. हे सर्व प्रकरण झाल्याच्या नंतर पारदर्शकता वाढविण्यासाठी मंदिर आणि नवीन नियम लागू केलेले आहेत चढाव्याची मोजणी अधिक पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी नवीन प्रक्रिया लागू करण्यात आली आहे. मोजणीच्या ठिकाणी कॅमेरे अगोदरच होते पण ए. आय. पद्धतीचे कॅमेरे सुरू केले असून, बॅग नेण्यास परवानगी नाकारली आहे. न्यासाच्या बैठकीत व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी नवीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती आणि प्रशासकीय बदलांवर देखील चर्चा होत असून ती सुद्धा गतिमान होत आहे. दोशी कोण आहे हे निष्पक्ष चौकशीतून निश्चित करून आवश्यक कारवाई करून त्याच्यावर कठोर कारवाई केली जावी अशी न्यासाची अगोदरची भूमिका आहे. श्रद्धा आणि व्यवस्थापना या दोन्ही बाबी वेगवेगळ्या आहेत काही व्यक्तींवर आरोप झाल्याने श्रीरामांवरील श्रद्धा किंवा श्रीराम मंदिराचे धार्मिक महत्त्व जे राजकीय मानसिकता असलेल्या शत्रूकडून आणि राष्ट्रविरोधी शक्तींकडून कमी करण्याचा प्रयत्न होत असला तरी, त्याचे धार्मिक महत्त्व कमी होणार नाही. चौकशी ही व्यवस्थापनातील बाब आहे या प्रकरणामुळे भविष्यात देणगी व्यवस्थापन, लेखापरीक्षण आणि देखरेख अधिक मजबूत करण्याची संधी निर्माण झाली आहे. परत एकदा सांगतो जोपर्यंत पूर्ण चौकशी होईल तोपर्यंत कोणाला दोषी किंवा कोणाला निर्दोष ठरवणे हे मीडियाच्या माध्यमातून कधीही योग्य नाही. भारतीय न्यायव्यवस्था प्रगल्भ आहे आणि भारतीय न्यायव्यवस्था त्यांना योग्य ती शिक्षा निश्चित देईल आपण आपल्या श्रद्धा ह्या पक्का ठेवाव्यात. ह्या विषयावर एसआयटी स्थापित झाली आहे एसआयटी स्थापन झाल्यानंतर ट्रस्टने आपली नैतिक जबाबदारी स्वीकारून काही लोकांनी राजीनामे सुद्धा दिलेले आहेत. पण या व्यक्तीवर झालेल्या आरोपांचा आधार घेऊन संपूर्ण राम मंदिर, हिंदुत्व, विश्व हिंदू परिषद, किंवा कोट्यावधी हिंदूंच्या श्रद्धेलाच घाव घालण्याचा प्रयत्न हा काही लोकांकडून होत आहे. चुकीच्या व्यक्तीला शिक्षाही झालीच पाहिजे, परंतु काही व्यक्तींमुळे सर्व हिंदू समाजाच्या श्रद्धेलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे हे योग्य नाहीये. ह्या देशात एका दुसऱ्या धर्माच्या बाबतीतील कोणताही हिशोब कधीच पुढे आला नाही, त्या बाबतीत कोणतेही मीडिया, राजकीय व्यक्ती काहीही बोलत नाहीत, पण काही व्यक्तींच्या कथित गैव्यवहारचा आधार घेऊन कोट्यवधी हिंदूंची श्रद्धा, श्रीराम मंदिर, हिंदुत्व, ह्याला बदनाम करण्याचे हे षडयंत्र आहे असा म्हणायला वाव आहे. पण आपण आपली आस्था, श्रद्धा, साधना आणि समर्पणाची वृत्ती कायम ठेवून सदैव राष्ट्रहितासाठी, सुसज्ज, विचारसज्ज आणि सर्वात महत्त्वाचं चिंतनशील असावं, तूर्तास्त इतकेच...

**- विशाल वसंतराव मुळे आजेगांवकर...**

# मुंबईसह राज्यात पावसाचा कहर

## धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ

**मुंबई :** मुंबई, ठाण्यासह महाराष्ट्रात मान्सूनचा जोर वाढला असून पुढचे चार दिवस ही स्थिती अशीच राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे ७ तारखेपर्यंत राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा हाहाकार सुरू राहणार आहे. हवामान विभागाने पुढच्या तीन दिवसांसाठी मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड, पुणे, सातारा जिल्ह्यांसाठी 'रेड अलर्ट' जारी केला असून अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. काही ठिकाणी ताशी ६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान मुंबईत अनेक ठिकाणी झाडे पडण्याच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाल्याची माहिती समोर येत आहे. दादरमधील शिवसेना भवन समोरील मार्गावर झाडं पडले. तसेच वांद्रे येथे उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या वाहनांच्या ताफ्यासमोर झाड पडले. त्यामुळे काही काळ ताफा थांबवावा लागला. कालांतराने रस्ता मोकळा झाल्यावर ताफा पुढे मार्गस्थ झाला.मुंबई उपनगरातील कुर्ला कमानी येथील गोम्स टाऊन इमारतीजवळ असणा-या दुकानावर झाड पडून त्यात युनुस कुंडावाला, वय ६३ वर्षे यांचा मृत्यू झाल्याचे फौजिया रुग्णालयातून कळविण्यात आले आहे.मुंबईतील पावसामुळे रेल्वे मंत्रालयाने बुलेट ट्रेनच्या बोगदा खोदण्याच्या कामाचा औपचारिक शुभारंभ पुढे ढकलला आहे. हवामानामुळे रेल्वे मंत्रालयाने बुलेट ट्रेनच्या बोगदा खोदकामाच्या शुभारंभास विलंब केला आहे, परंतु प्रकल्पाला होणारा विलंब टाळण्यासाठी तातडीने काम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

अतिमुसळधार पावसामुळे सखल भागात पाणी साचल्याने अनेक मार्ग बंद झाले होते. ज्यात अंधेरीमध्ये अंधेरी सब वे, वीरा देसाई मार्ग आणि स्वामी विवेकानंद मार्ग बंद झाले होते. चेंबूर येथील नूर ए इलाही सर्विस रोडवर पाणी साचले होते. विक्रोळीत हुमा मॉल जंक्शन आणि गांधीनगर जंक्शन, यासारख्या अनेक ठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक खोळंबली होती. एकूणच अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र दिसत आहे.

# वारीत अत्यावश्यक रुग्णांकरिता प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.**

**परभणी :** आषाढी यात्रेसाठी पालखी सोहळ्यासोबत लाखो वारकरी भाविक येत असतात. पालखी मार्गावर तसेच आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीतून वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका, बाईक ॲम्बुलन्सचा वापर करण्यात येतो. यावर्षीपासून अत्यावश्यक रुग्णांकरिता नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज दिली.






आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना पालखी मार्ग व तळांवर देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर यांच्यासह पुणे, सातारा, सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगरपालिका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक आणि तालुका आरोग्य अधिकारी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित होते.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, "वारकरी वारीसाठी घरातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा घरी पोहोचेपर्यंत आरोग्याच्या सर्व आवश्यक सुविधा पुरवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. त्या नियोजनाप्रमाणे सर्व सेवा पुरवाव्यात. वारी कालावधीत भाविकांना डिजिटल आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत. 'आरोग्य संपन्न वारी' व 'वारी सहाय्य' या माध्यमातून पालखी मार्गावर वारकरी भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असून, यामध्ये प्रत्येक आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांच्यामार्फत माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे."

"वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा पुरवताना कोणतीही उणीव राहू नये. वारी कालावधीत आरोग्य सुविधा देण्यासाठी पंढरपूर येथील स्थानिक डॉक्टरांची उपलब्धता राहण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांनी स्वतंत्र बैठक घेऊन त्यांना सूचना द्याव्यात. पालखी मार्गावरील तसेच शहरातील खासगी वैद्यकीय रुग्णालयांतील दहा टक्के खाटा आरक्षित करण्यात येणार आहेत. खासगी डॉक्टरांना आरोग्य सेवा देण्याचे आवाहन आपण करतो, त्यामुळे सरकारी डॉक्टरांनीही अधिक जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने सेवा द्यावी. वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यात सार्वजनिक आरोग्य विभाग कुठेही कमी पडता कामा नये.", असे त्यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाने यंदाच्या आषाढी वारीत गंभीर रुग्णांसाठी एअर ॲम्बुलन्सची सुविधा आणि 'आरोग्यसंपन्न वारी' मोबाईल ॲप ही आरोग्य व्यवस्थेची दोन महत्त्वाची साधने उपलब्ध करून दिली आहेत. मोबाईल ॲपच्या माध्यमातून वारकऱ्यांना पालखी मार्गावरील आरोग्य सुविधा, उपचार केंद्रे व तातडीच्या वैद्यकीय सेवांची माहिती सहज उपलब्ध होणार असून, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

बैठकीच्या सुरुवातीला आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर यांनी विभागामार्फत वारीसाठी करण्यात आलेल्या उपाय योजना तसेच नियोजनाविषयी माहिती दिली. तत्पूर्वी,आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी औंध येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाला भेट देऊन तेथील आरोग्य सेवांचा आढावा घेतला आणि रुग्णांशी संवाद साधून आस्थेने विचारपूस केली. त्यानंतर पालखी मार्गावरील वारकऱ्यांच्या मुक्काम स्थळी भेट देऊन आरोग्य सेवांची पाहणी केली. त्याचप्रमाणे मुक्काम स्थळावरील पिण्याच्या पाण्याची सुविधा, विहिरी तसेच रेस्टॉरंट यांचीही पाहणी केली. पालखी मार्गावरील आरोग्य केंद्र तसेच पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयाला भेट देऊन तेथील आरोग्य सेवांचा आढावा घेतला.

वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या प्रमुख आरोग्य सुविधा

- पालखी मार्गावरील पाणी स्रोतांचे सर्वेक्षण व निर्जंतुकीकरण. - डेंग्यू, मलेरिया आदी कीटकजन्य आजारांचे सर्वेक्षण तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना. - पालखी मार्गावरील हॉटेल, ढाबे व उपहारगृहांतील कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी व उपचार. - वारीनंतर ग्रामपंचायतींच्या माध्यमातून विशेष स्वच्छता अभियान. - असंसर्गजन्य आजारांची तपासणी, समुपदेशन व उपचार सुविधा. - पालखी मार्गावरील खासगी रुग्णालयांमध्ये अत्यावश्यक सेवांसाठी १० टक्के खाटा राखीव. - पालखी मार्गावर ४३ ठिकाणी सुसज्ज आयसीयू सुविधा. - पालखी मार्गावर १५६ ठिकाणी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' मार्फत प्राथमिक उपचार केंद्रे. - वारकऱ्यांच्या सेवेसाठी २१५ आरोग्यदूतांची नियुक्ती. - पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण भागात १६ आयसीयू कक्ष आणि १७ तात्पुरते ' आपला दवाखाना' सुरू. - विठ्ठल मंदिर परिसरात २४x७ सुसज्ज आयसीयू कक्ष कार्यरत. - पंढरपूर व माळशिरस ग्रामीण भागात अतिरिक्त ५ आयसीयू कक्ष. - पालखी मार्गावर ३५३ रुग्णवाहिका (३८ ALS, ७३ BLS आणि '१०२' क्रमांकाच्या २४२ रुग्णवाहिका) तैनात. - गंभीर रुग्णांसाठी एअर ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध. - प्रत्येक दिंडी प्रमुखास प्राथमिक उपचार औषध संचाचे वितरण. - सेवेसाठी ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच ३०२ तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती. - पंढरपुरात तीन दिवस २४x७ महाआरोग्य शिबिर, सर्व तज्ज्ञ सेवा व ५ खाटांचे आयसीयू. - पालखी मार्गावरील सर्व आरोग्य सुविधा, रुग्णवाहिका व उपचार केंद्रांचे डिजिटल मॅपिंग. - 'आरोग्यसंपन्न वारी' मोबाईल ॲपद्वारे तात्काळ आरोग्य सुविधांची माहिती. - महाआरोग्य शिबिरात वारकऱ्यांना मोफत चष्म्यांचे वाटप. - आरोग्यविषयक जनजागृतीसाठी पोस्टर्स, फलक, पत्रके, माहिती रथ तसेच टोपी, टी-शर् यावर आरोग्य संदेशांचे वितरण.

# मुंबईत सोसाट्याच्या वाऱ्याचा तडाखा! 142 झाड/फांदी पडण्याच्या घटना; 2 दुर्दैवी मृत्यू

**मुंबई:** ताशी ७२ ते ७५ किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार पावसाने मुंबईला झोडपून काढले असून बृहन्मुंबई क्षेत्रात झाडे व फांद्या पडण्याच्या तब्बल १४२ घटनांची नोंद झाली आहे. या संपूर्ण परिस्थितीत महापालिकेची यंत्रणा सतर्क असून सुमारे १० हजार अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष मैदानात कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान, गेल्या २४ तासांत मुंबईत सुमारे १५० ते १७० मिमी पावसाची नोंद झाली असून, संततधार पाऊस आणि समुद्राला मोठी भरती असूनही शहरातील जनजीवन तुलनेने सुरळीत राहिले. विशेष म्हणजे, मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस होऊनही कोठेही पाणी साचल्याची गंभीर घटना नोंदवली गेली नाही, तसेच रेल्वे वाहतूकही सुरळीत सुरू होती.

हवामान खात्याचा रेड अलर्ट; प्रशासन सतर्क

भारतीय हवामान खात्याने (IMD) मुंबईसाठी रेड अलर्ट जारी केला असून मुसळधार



ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. याच पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी मुख्यालयातील आपत्कालीन नियंत्रण कक्षातून सतत परिस्थितीचा आढावा घेतला आणि सर्व यंत्रणांना अलर्टवर राहण्याचे निर्देश दिले. महानगरपालिकेच्या सर्व परिमंडळ उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, अभियंते, आरोग्य कर्मचारी, पंपचालक तसेच आपत्कालीन पथकांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात उपस्थित राहण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

**दुर्दैवी घटना:** दोन मृत्यू

या वादळी परिस्थितीत दोन वेगवेगळ्या दुर्घटनांमध्ये दोन नागरिकांचा मृत्यू झाला आहे. कुर्ला कमानी परिसरात झाडाची फांदी कोसळून युनूस कुंडावाला (६३) यांचा मृत्यू झाला, तर आरे कॉलनीतील युनिट १३ परिसरात झाड कोसळून १८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला.

**आणखी घटना; काही ठिकाणी बांधकाम कोसळले :**

वरळी डेअरीजवळ खान अब्दुल गफार खान मार्गावर तीन मजली रिकामे बांधकाम कोसळल्याची नोंद झाली आहे. सुदैवाने या घटनेत मोठी जीवितहानी टळली.

**प्रशासनाचा सतर्कतेचा इशारा :**

महापालिका आयुक्तांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सतत फिल्डवर राहून परिस्थितीवर नजर ठेवण्याचे निर्देश दिले असून, कोणतीही आपत्कालीन घटना घडल्यास तात्काळ प्रतिसाद देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मुंबईत सध्या संपूर्ण यंत्रणा अलर्ट मोडमध्ये कार्यरत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# भाजप राजस्थान व महिला प्रकोष्ठाची द्वितीय कार्यकारिणी बैठक संपन्न; आगामी उपक्रमांचे नियोजन

## रक्तदान शिबिर, अयोध्या यात्रा, शासकीय कागदपत्र शिबिरासह विविध उपक्रमांवर सविस्तर चर्चा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पक्षाच्या राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठाची द्वितीय कार्यकारिणी बैठक रविवारी खडकेश्वर येथील हॉटेल कृष्णा इन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीत विविध सामाजिक, धार्मिक व संघटनात्मक उपक्रमांचा आढावा घेऊन आगामी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले.



बैठकीच्या प्रारंभी राजस्थान प्रकोष्ठाचे माजी उपाध्यक्ष स्वर्गीय नरेश सुरग यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर आषाढी एकादशीनिमित्त प्रसाद वितरण, शासकीय कागदपत्र शिबिर, रक्तदान शिबिर, अयोध्या यात्रा, समाज पालकमंत्री कार्ययोजना तसेच 'पंचतत्त्व' या सांस्कृतिक कार्यक्रमाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रकल्पप्रमुखांचीही नियुक्ती करण्यात आली.

या बैठकीस सोमनाथ तांबी, जगदीश जांगिड, सीए नंदकिशोर मालपाणी, हरीओम राठोड, विपीन गुजराणी, योगेश भाटी, दीपक फुलबाती, सागर पांडे, पुनमचंद सुराणा, ऋषी दायमा, सुदर्शन जाजू, निलेश मित्तल, धर्मेंद्र जांगिड, जयप्रकाश खंडेलवाल, संजय मंत्री, ललिता करवा, वनिता नाटाणी, दीपाली भराडिया, चंचल करवा, चंदा वर्मा, ज्योती अपूर्वा, विद्या शर्मा, अर्चना चांगल, भावना जोशी, लक्ष्मी गुप्ता, अंकिता अग्रवाल, किरण रोडा, मंजू खंडेलवाल यांच्यासह प्रकोष्ठाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन महिला प्रकोष्ठाच्या अध्यक्षा ललिता करवा यांनी केले, तर सरचिटणीस सोमनाथ तांबी यांनी उपस्थितांचे आभार मानले.



**सोयगाव - छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदी निवडून आल्याबद्दल शिवसेना भवन कार्यालय सोयगाव येथे प्रभाकर (आबा) काळे यांचा जाहीर सत्कार करताना सोयगाव नगरपंचायतचे गटनेते अक्षय काळे,शिवसेना शहर प्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,कदिर शहा,भैरवनाथ पतसंस्थेचे मॅनेजर धनराज औरंगे आदींसह उपस्थित होते.**

# भेंडाळा येथे पालखी मुक्कामादरम्यान आरोग्य व्यवस्थेची पाहणी; वारकऱ्यांना दर्जेदार सेवा देण्याच्या सूचना



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**भेंडाळा :** श्री संत जनार्धन स्वामी पालखी सोहळ्याच्या भेंडाळा येथील मुक्कामाच्या पार्श्वभूमीवर प्राथमिक आरोग्य केंद्रात उभारण्यात आलेल्या आरोग्य सुविधांची सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी पाहणी केली. यावेळी आरोग्य पथकाकडून वारकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सेवा, उपलब्ध औषधसाठा, भोजन व्यवस्था तसेच पिण्याच्या पाण्याच्या सुविधेची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. गाव भेटीदरम्यान "माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" या उपक्रमाबाबत नागरिकांशी संवाद साधण्यात आला. आरोग्य सेवांबाबत विचारणा केली असता एका ग्रामस्थाने, "आज मी प्राथमिक आरोग्य केंद्र भेंडाळा येथे ईसीजी तपासणी करून आलो. सरकारी आरोग्य योजनांवर आमचा विश्वास असून आम्ही समाधानकारक सेवा मिळत असल्याचा अनुभव घेतला," अशी सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केली. दिंडीचे आगमन झाल्यानंतर वारकऱ्यांना उपलब्ध आरोग्य सेवा, आपत्कालीन उपचार आणि आरोग्यविषयक काळजीबाबत वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. शैलजा व डॉ. संदीपान काळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच आरोग्य शिक्षणाद्वारे विविध आजारांपासून बचाव करण्याबाबत जनजागृती करण्यात आली.

# नाचनवेल–गोंदेगाव रस्त्यासाठी 13 गावे एकवटली; दोन हजार ग्रामस्थांच्या स्वाक्षरीसह निवेदन

**फर्दापूर :** नाचनवेल–शेलगाव–घाटनांद्रा–बोरमाळ–तिडका–वरठाण–गोंदेगाव–निंभोरा–पाचोरा या महत्त्वाच्या रस्ता क्र. ४० व ४८ च्या नूतनीकरणासाठी परिसरातील १३ गावे एकवटली असून तब्बल दोन हजार ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्यांसह मुख्यमंत्री सचिवालयाकडे निवेदन सादर करण्यात आले.



मुख्यमंत्री सचिवालयात निवेदन सादर करताना जय संघर्ष ग्रुपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रवीण वाघ, सामाजिक कार्यकर्ते तथा दैनिक पुढारीचे पत्रकार गणेश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ मोरे, जय संघर्ष ग्रुपचे पदाधिकारी दिलीप खांबट, सामाजिक कार्यकर्ते विशाल बिंदवाल तसेच नाचनवेलचे माजी उपसरपंच रावसाहेब शिंदे उपस्थित होते.

खान्देश आणि मराठवाड्याला सर्वात कमी अंतराने जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग सध्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अत्यंत धोकादायक बनला आहे. विशेषतः घाटनांद्रा घाटात वारंवार दरडी कोसळणे, भराव वाहून जाणे तसेच रस्त्याची मोठ्या प्रमाणात झालेली दुरवस्था यामुळे प्रवाशांसह विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर आणि वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

मागील वर्षी १५ व १६ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे घाटनांद्रा घाटातील भराव वाहून गेला होता. घाटातील संरक्षक कठडे तुटल्याने सुमारे चार महिने बससेवा व इतर वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यावेळी शासनाने केवळ तात्पुरती दुरुस्ती करून वाहतूक सुरू केली; मात्र कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या रस्त्याच्या नूतनीकरणासाठी अनेक वर्षांपासून विविध सामाजिक संघटना, ग्रामस्थ आणि कार्यकर्ते निवेदने, आंदोलने व पाठपुरावा करीत आहेत. जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संस्थेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रवीण वाघ यांनी १७ सप्टेंबर २०२५ पासून स्थानिक आमदार, खासदार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे घाटनांद्रा घाटासह संपूर्ण रस्ता सिमेंट कॉँक्रीटचा करण्याची मागणी सातत्याने केली. मात्र, संबंधित विभागाकडून ठोस कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत १ मेपासून स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली. नाचनवेल, शेलगाव, घाटनांद्रा, बोरमाळ, तिडका, पळाशी, बनोटी, वरठाण, वाकडी, घोरकुंड, म्हशेकोठा, निंभोरा आणि गोंदेगाव या १३ गावांतील ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सुमारे दोन हजार स्वाक्षऱ्या जमा केल्या. विविध सामाजिक संघटनांच्या समर्थनपत्रांसह या स्वाक्षऱ्यांचे निवेदन १ जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री सचिवालयाकडे पाठविण्यात आले.

# शिवाजीनगरात कोयता घेऊन दहशत माजवणारा सराईत पोलिसांच्या जाळ्यात

## जवाहरनगर बिट मार्शलची धडाकेबाज कारवाई; कोयता व 20 हजारांचा मोबाईल जप्त, आरोपीवर हत्यार कायद्यान्वये गुन्हा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शिवाजीनगर परिसरात हातात धारदार कोयता घेऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या सराईत आरोपीला जवाहरनगर पोलिसांच्या बिट मार्शल पथकाने अवघ्या काही मिनिटांत पाठलाग करून जेरबंद केले. आरोपीच्या ताब्यातून धारदार कोयता आणि विवो कंपनीचा मोबाईल असा एकूण २० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

४ जुलै रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास बिट मार्शलचे पोलीस अंमलदार मारोती गोरे यांना गुप्त माहिती मिळाली की, शिवाजीनगर परिसरात एक युवक हातात कोयता घेऊन नागरिकांमध्ये दहशत पसरवत फिरत आहे. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोरे, पोलीस हवालदार उपाध्ये, डायल-११२ पथकातील पोलीस हवालदार वामन नागरे आणि बिट मार्शल पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

रेल्वे पटरीलगतच्या भुयारी मार्गाजवळ संशयित दिसताच त्याने पोलिसांना पाहून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी चपळाईने पाठलाग करत काही अंतरावरच त्याला पकडले. चौकशीत त्याने दीपक उर्फ यश सचिन साळवे (वय १९, रा. इंदिरानगर, गारखेडा) असल्याचे सांगितले.



अंगझडतीमध्ये त्याच्या कंबरेला धारदार कोयता आणि खिशात सुमारे २० हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल आढळून आला. मोबाईलबाबत समाधानकारक माहिती देता न आल्याने दोन्ही वस्तू जप्त करण्यात आल्या.

पोलीस आयुक्तांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध जवाहरनगर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यातील कलम ४, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासादरम्यान आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे समोर आले. त्याच्याविरुद्ध यापूर्वी मोबाईल हिसकावल्याचा गुन्हा दाखल असून अल्पवयीन असतानाही दोन गुन्ह्यांची नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

ही कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपआयुक्त रत्नाकर नवले, सहाय्यक पोलीस आयुक्त नरेंद्र पाडळकर आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोरे, पोलीस हवालदार उपाध्ये, पोलीस हवालदार वामन नागरे आणि बिट मार्शल पोलीस अंमलदार मारोती गोरे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

# इद्रिस मुलतानी यांच्या नियुक्ती बद्दल सत्कार करताना भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते

**सावळदबारा प्रतिनिधी :** भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी याची मुस्लिम समाजाच्या राज्यस्तरीय अभ्यास समितीच्या अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) नियुक्ती झाल्याबद्दल भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी भेट घेऊन इद्रिस मुलतानी यांचा सत्कार करून शुभेच्छा दिले आहेत



अत्यंत महत्त्वाची जबाबदारी इद्रिस मुलतानी यांच्यावर सोपविण्यात आली आहे. राज्याच्या धोरणात्मक निर्णयप्रक्रियेत थेट सहभाग घेण्याची ही मोठी संधी मानली जात आहे.

राज्यस्तरीय अभ्यास समितीचे अध्यक्ष म्हणून इद्रिस मुलतानी यांच्यावर राज्यभरातील विविध विभाग व जिल्ह्यांचा अभ्यास दौरा करण्याची जबाबदारी असणार आहे. या दौऱ्यांचे नियोजन संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या समन्वयाने करण्यात येणार असून, विविध भागांतील वस्तुस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन समिती शासनाला अभ्यासपूर्ण अहवाल सादर करणार आहे. समितीचे प्रशासकीय कामकाज मुंबई येथील कार्यालयातून चालणार असून, बैठका, माहिती संकलन, अभ्यास दौरे आणि शासनाला शिफारसी सादर करण्याची संपूर्ण प्रक्रिया याच माध्यमातून राबविण्यात येणार आहे. त्यामुळे राज्य प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समन्वय साधत प्रभावीपणे काम करण्याची मोठी संधी इद्रिस मुलतानी यांना प्राप्त झाली आहे

मुस्लिम समाजाच्या राज्यस्तरीय अभ्यास समितीच्या अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) इद्रिस मुलतानी यांची नियुक्ती झाली आहेत विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि व्यापारी क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहेत

सिल्लोड-सोयगाव तालुक्यातून प्रथमच राज्यस्तरीय अभ्यास समितीच्या माध्यमातून सात वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या टीमसोबत काम करण्याची संधी स्थानिक नेतृत्वाला मिळाली आहे. राज्यातील मुस्लिम समाजाच्या विविध प्रश्नांचा सर्वंकष अभ्यास करून शासनाला शिफारसीसह अहवाल सादर करण्याची

# पैशांसाठी विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ, सासरच्या मंडळीवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी:** विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडल्यानंतर नवरी सासरी नांदायला गेली असताना पैसे व इतर वस्तूची मागणी करत विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी पती सासरे दोन नणंद दोन नंदवे असे सहा जनाविरोधात नाना पेठ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे याबाबत सविस्तर माहिती अशी की फिर्यादी ऋतुजा बिन्हाडे यांचा विवाह 2024 मध्ये पनवेल येथील ऋषिकेश बिन्हाडे यांच्याशी झाला होता लग्नानंतर फिर्यादी सासरी नांदण्यासाठी गेल्यानंतर पती ऋषिकेश बिन्हाडे सासरे भाऊसाहेब बिन्हाडे मोठी नणंद मिताली होंवाल धाकटी नणंद अंकिता मरवडे तसेच नंदई विशाल होवाळ व रघुनाथ मरवडे विवाहितेस माहेरा वरून फॉर्च्युनर कार सोने आणण्याची मागणी व मागणी पूर्ण न केल्यास फिर्यादीला शुल्लक कारणावरून वसतत अपमान मारहाण करत असल्या प्रकरणी फिर्यादी ऋतुजा बिन्हाडे यांच्या फिर्यादी वरून चार जुलै रोजी पती ऋषिकेश भाऊसाहेब बिन्हाडे सासरे भाऊसाहेब राजाराम बिन्हाडे नणंद मिताली विशाल ओवाळ अंकिता रघुनाथ मरवाडे विशाल संपत होवाळ रघुनाथ मारुती मरवडे त्यांच्या विरोधात नाना पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहे.

# महर्षी कर्वे यांचे स्त्रीशिक्षणाचे स्वप्न विद्यार्थिनींच्या यशातून साकार करू – डॉ. केजल भारसाखळे

## ए.ई.व्ही.पी.एम. वुमन्स कॉलेजमध्ये एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचा 111 वा स्थापना दिन उत्साहात साजरा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील पहिले महिला विद्यापीठ असलेल्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचा १११ वा स्थापना दिन ए.ई.व्ही.पी.एम. वुमन्स कॉलेजमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थिनींना गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि नेतृत्वक्षमतेच्या माध्यमातून सक्षम व आत्मनिर्भर बनविण्याचा निर्धार व्यक्त करताना, "महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे स्त्रीशिक्षणाचे स्वप्न प्रत्येक विद्यार्थिनीच्या यशातून साकार करू," असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. केजल भारसाखळे यांनी केले.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. भारसाखळे म्हणाल्या की, महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षणासाठी पेटविलेला ज्ञानाचा दीप आजही समाजाला दिशा देत आहे. आधुनिक काळातील आव्हानांचा विचार करून विद्यार्थिनींना जागतिक दर्जाचे शिक्षण, संशोधन, उद्योजकता आणि सामाजिक नेतृत्वासाठी सक्षम करणे ही महाविद्यालयाची बांधिलकी असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. प्रवीण पाव्हरे यांच्या सूत्रसंचालनाने झाली. मान्यवरांनी भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर विद्यार्थिनींनी विद्यापीठ गीत सादर करून कार्यक्रमाला सुरुवात केली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वर्षा गायगोळे यांनी प्रास्ताविकात एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या १११ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत महिला शिक्षणातील विद्यापीठाच्या ऐतिहासिक योगदानावर प्रकाश टाकला.

प्रमुख पाहुण्या डॉ. स्वाती नखाले यांनी महिला सक्षमीकरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकास, संशोधन आणि नेतृत्व विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनींनी ज्ञान, मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल राखत उत्कृष्टतेकडे वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थिनी प्रतिनिधीने मनोगत व्यक्त करत विद्यापीठ व महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक संधींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. सारिका हनवते यांनी केले, तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थिनी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चौकट

ए.ई.व्ही.पी.एम. वुमन्स कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या १११ व्या स्थापना दिनानिमित्त भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संचालिका डॉ. केजल भारसाखळे, प्रमुख पाहुण्या डॉ. स्वाती नखाले, प्राचार्या डॉ. वर्षा गायगोळे, प्राध्यापक व मान्यवर उपस्थित होते.

# बालकांच्या सुरक्षेसाठी जागरूकता महत्त्वाची, पोक्सो कायद्याबा वेळोवेळी समुद्रेशन करावे : न्याय मूर्ती संजय देशमुख

## पॉक्सो जनजागृती शिबिरातून सजग समाजाचा संदेश

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि श्री शिवाजी विधी महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने 'लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (POCSO)' या विषयावरील जनजागृती प्रशिक्षण शिबिर श्री शिवाजी विधी महाविद्यालयात आज संपन्न झाले.

बालकांच्या सुरक्षिततेबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिरात न्यायव्यवस्था, पोलीस, वैद्यकीय अधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा परभणी जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती संजय ए. देशमुख हे उद्घाटक व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते तर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आर. एम. सादराणी अध्यक्षस्थानी होते. तसेच वकील संघाचे अध्यक्ष एस. टी. अडकिने, श्री शिवाजी विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एल. धर्मापुरीकर व्यासपीठावर उपस्थित होते.







कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते रोपट्यांना पाणी घालून करण्यात आली.

मार्गदर्शन करताना न्यायमूर्ती संजय देशमुख म्हणाले की, बालपण हा प्रत्येक मुलाचा जगप्रसिद्ध हक्क आहे. भीती, अत्याचार आणि शोषण नव्हे, तर प्रेम, सन्मान आणि सुरक्षितता हेच त्यांचे खरे वातावरण असले पाहिजे. गुन्हा घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा तो घडूच नये यासाठी समाजात जागरूकता निर्माण करणे, ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, "नाठाळाचे माथी हाणा कायद्याची काठी" या उक्तीचा अर्थ समजून प्रत्येकाने कायद्याचा आदर केला पाहिजे. गोड बोलून विश्वास संपादन करणाऱ्या व्यक्तींपासून सावध राहण्याचा सल्ला देत त्यांनी "जिथे विश्वास, तिथे विश्वासघाताची शक्यता अधिक असते," असे सांगितले.

समर्थ रामदासांच्या "अखंड सावधान असावे..." या उक्तीचा संदर्भ देत विद्यार्थ्यांनी जुडो, कराटे, कुस्ती यांसारख्या स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा अवलंब करावा, प्रसंगी स्वतःचे संरक्षण करण्यासाठी धैर्याने उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले. विशेषतः मुलींनी स्वतःला कमी समजू नये, संकटसमयी आत्मविश्वासाने प्रतिकार करण्याची मानसिक तयारी ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक न्यायाधीश आर. एम. सादराणी यांनी केले.

यावेळी तपास अधिकारी श्री. स्वामी यांनी पॉक्सो प्रकरणांच्या तपासादरम्यान येणाऱ्या अडचणींची माहिती दिली, तर डॉ. किशोर सुरवसे यांनी वैद्यकीय तपासणी प्रक्रियेत येणाऱ्या व्यावहारिक अडचणी आणि त्यावरील उपाय स्पष्ट केले.

सूत्रसंचालन डॉ. एस. डी. जवंजाळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. एम. एल. धर्मापुरीकर यांनी केले. या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण म. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिबिराला न्यायिक अधिकारी, वकील, सरकारी वकील, पोलीस अधिकारी, डॉक्टर, शिक्षक, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, पत्रकार, विद्यार्थी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री शिवाजी विधी महाविद्यालय व जिल्हा न्यायालयातील अधिकारी-कर्मचारी यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# जिल्हा परिषद मैदानात झाडाची विशाल फांदी कोसळली; स्मार्ट सिटी बसथांब्यालगत मोठी दुर्घटना टळली

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शहरात सुरू असलेल्या पावसासह जोरदार वाऱ्यामुळे रविवारी जिल्हा परिषदेच्या मागील मैदानातील एका मोठ्या झाडाची फांदी तुटून खाली कोसळली. ही घटना स्मार्ट सिटी बसथांब्यालगत घडल्याने काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने घटनेच्या वेळी फांदीखाली कोणीही नसल्याने जीवितहानी झाली नाही.




ज्या ठिकाणी फांदी कोसळली, त्या परिसरातून दिवसभर नागरिक, विद्यार्थी आणि शासकीय कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. तसेच स्मार्ट सिटी बसथांबा असल्याने प्रवाशांचीही सतत वर्दळ असते.

सध्या शहरात पावसासह जोरदार वारे वाहत असून अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या धोकादायक अवस्थेत असल्याचे चित्र आहे. मात्र, अशा झाडांची वेळेत छाटणी होत नसल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

घटनेनंतर नागरिकांनी संबंधित विभागाने धोकादायक झाडांची तातडीने पाहणी करून आवश्यक त्या फांद्यांची छाटणी करावी, अशी मागणी केली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणांवरील झाडांची तपासणी करून संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकाकडून होत.

# कागद फुटले, स्वप्न नाही! आज लाखो विद्यार्थ्यांचा एल्गार ; वाहतूक मार्गात मोठे बदल

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : स्पर्धा परीक्षांमधील सातत्याने होणारे पेपरफुटीचे प्रकार, सरकारी भरती प्रक्रियेतील गैरप्रकार आणि राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी उद्या, ६ जुलै रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये विद्यार्थ्यांचा प्रचंड जनक्षोभ पाहायला मिळणार आहे.

'महाराष्ट्र राज्य विद्यार्थी कृती समिती'च्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर या भव्य आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. या आंदोलनात मराठवाड्यासह राज्यातील हजारो विद्यार्थी आणि तरुण रस्त्यावर उतरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये आणि वाहतूक कोंडी टाळता यावी, यासाठी शहर वाहतूक शाखेने कंबर कसली आहे. पोलिसांनी उद्या सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत आंदोलन परिसरातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल केले असून अनेक मुख्य रस्ते बंद केले आहेत.

आंदोलनाचा मुख्य केंद्रबिंदू विभागीय आयुक्त कार्यालय असल्याने प्रशासनाने सुरक्षेचा उपाय म्हणून चांदणी चौक ते विभागीय आयुक्त कार्यालय ते उद्धवराव पाटील चौक हा मार्ग सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हा मुख्य रस्ता बंद राहणार असल्यामुळे वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष पर्यायी मार्ग निश्चित केले आहेत. त्यानुसार चांदणी चौक येथून पुढे जाणाऱ्या वाहनधारकांना आता गणेश कॉलनीमार्गे एन-१२ येथील गणेश विसर्जन विहीर, उद्धवराव पाटील चौक, सत्यविष्णू हॉस्पिटल चौक आणि टी.व्ही. सेंटरमार्गे पुढे ये-जा करता येईल. तसेच हडको कॉर्नर बाजूने ये-जा करणाऱ्या वाहनधारकांसाठी उद्धवराव पाटील चौक, हडको कॉर्नर, टी.व्ही. सेंटर, एन-१२ गणपती विसर्जन विहीर हा मार्ग खुला करण्यात आला आहे.या भव्य आंदोलनासाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून शेकडो वाहने येण्याची शक्यता आहे. शहरात कुठेही अस्ताव्यस्त पार्किंग होऊन वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने ५ मुख्य ठिकाणी अधिकृत पार्किंगची व्यवस्था केली आहे.

यामध्ये आंदोलनासाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांना आणि विद्यार्थ्यांना आपली वाहने हज हाऊस परिसर, गव्हर्नमेंट कॉलेज मैदान, सुभेदारी टी-पॉइंटसमोरील भारत स्काऊट आणि गाईड ग्राऊंड, लेबर कॉलनी ग्राऊंड तसेच दिल्ली गेटच्या पलीकडील मोकळ्या भागात उभी करावी लागणार आहेत. उद्या सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत विभागीय आयुक्त कार्यालय परिसराकडे जाणे टाळावे आणि अत्यंत महत्त्वाचे काम असल्यास पोलिसांनी जाहीर केलेल्या पर्यायी मार्गांचाच अवलंब करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन शहर वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे.

# शिंदे सेनेचा शेतकरीसंवाद मेळावा रद्द, उपमुख्यमंत्री शिंदे यांचा दौरा रद्द; खासदार संजय जाधव यांची माहिती

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** येथील इंदिरा गांधी क्रीडा संकुल येथे मंगळवार दिनांक सात जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीतील शेतकरी संवाद मेळावा पार पडणार होता परंतु त्यांचे प्रकृती ठीक नसल्याकारणाने शेतकरी संवाद मेळावा पुढे ढकलण्यात आला असून त्यांचा दौरा ही रद्द करण्यात आला आहे याबाबत अधिक माहिती खासदार संजय जाधव यांनी दिली व मेळाव्याचे नवीन तारीख लवकरच जाहीर करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले

खासदार संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी संवाद मेळाव्याचे मोठ्या प्रमाणावर तयारी करण्यात आली असून मेळाव्यासाठी विविध तालुक्यातून हजारो शेतकरी उपस्थित राहणार होते या संवाद मिळाव्याच्या अनुषंगाने प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियम येथे भव्य दिव्य व्यासपीठ विशाल महाकाय सभामंडप उभारण्यात आले होते मात्र शिंदे साहेबांचा अचानक दौरा रद्द झाल्याने या सर्व तयारीला थांबविण्यात आल्याने या मेळाव्यात दरम्यान विविध पक्षातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांचा शिंदे शिवसेनेत प्रवेश होणार होता मात्र शिंदे साहेबांचा दौरा रद्द झाल्याची बातमी मिळताच अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये काही प्रमाणात निराशा जनक वातावरण निर्माण झाले आहे लवकरच पुन्हा या कार्यक्रम आयोजित केला जाणार असून खा.संजय जाधव यांनी दिली.

# ल्युपिन फार्मास्युटीकलमध्ये रक्तदान शिबिराला प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : चिकलठाणा येथील ल्युपिन फार्मास्युटीकलमध्ये संस्थापक स्वर्गीय देशबंधू गुप्ता यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत १४१ जणांनी रक्तदान केले. सकाळी झालेल्या या शिबिराचे उद्घाटन संजय लेकुरवाले यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

यावेळी प्लँट हेड विष्णुदास असावा, एचआर हेड पूजा जैन, एफएमओ श्रीनिवास रक्षाळे, डिस्ट्रिक्ट मॅनेजर बाळासाहेब गर्जे, ईएचएस मॅनेजर विशाल पांडे यांच्यासह कंपनीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी स्वर्गीय देशबंधू गुप्ता यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

शिबिरादरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील विकृतीशास्त्र विभागाचे प्रमुख तथा उप-अधिष्ठाता डॉ. भारत सोनवणे यांनी रक्तदानाचे महत्त्व, त्याचे आरोग्यदायी फायदे आणि रक्तदानाबाबत समाजात असलेले गैरसमज याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.



रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी घाटीच्या विभागीय रक्तकेंद्राच्या प्रभारी डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. प्रमोद सरवदे, डॉ. अश्विनी तांगडे तसेच रक्तकेंद्रातील तंत्रज्ञ, विद्यार्थी आणि चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी बाळासाहेब गर्जे यांनी घाटीच्या रक्तकेंद्राला नियमित रक्तदान करून सर्वसामान्य व गरजू रुग्णांच्या उपचारासाठी सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत भविष्यातही सहकार्य करण्याची ग्वाही दिली. रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

## जालना ते लंडन थारमधून ऐतिहासिक कार प्रवास; बजाज दाम्पत्याचा भास्कर आबा दानवे यांच्या हस्ते सत्कार

# १९ देशांतून १७,६८३ किमी प्रवास; ७१ दिवसांची मोहीम यशस्वी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**जालना** : शहरातील हौशी कारचालक राजेश बजाज आणि सौ. सोनी बजाज यांनी आपल्या थार वाहनातून जालना ते लंडन असा ७१ दिवसांचा ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय कार प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन बजाज दाम्पत्याचा सत्कार केला.



यावेळी बजाज दाम्पत्याने प्रवासातील विविध अनुभव उपस्थितांसमोर मांडले. भारतासह १९ देशांमधून तब्बल १७,६८३ किलोमीटरचे अंतर स्वतः वाहन चालवत त्यांनी पूर्ण केले. या मोहिमेसाठी गेल्या तीन वर्षांपासून नियोजन, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, वाहनाची तयारी तसेच विविध देशांतील वाहतूक नियमांचा सखोल अभ्यास करण्यात आला होता.

गुरुग्राम येथील 'एडव्हेंचर्स ओव्हरलँड' संस्थेच्या वतीने आयोजित ही मोहीम १४ एप्रिल ते १९ जून २०२६ या कालावधीत पार पडली. जालन्यातील लोखंडी पुलावरून प्रवासाला प्रारंभ झाल्यानंतर गोरखपूर येथून अधिकृत मोहिमेला सुरुवात झाली. भारत, नेपाळ, चीन, किर्गिस्तान, उझबेकिस्तान, कझाकस्तान, रशिया, जॉर्जिया, तुर्किये, बल्गेरिया, सर्बिया, क्रोएशिया, हंगेरी, स्लोव्हाकिया, झेकिया, जर्मनी, नेदरलँड्स, बेल्जियम आणि फ्रान्स असा प्रवास करत त्यांनी १९ जून रोजी लंडन गाठले.

या प्रवासात विविध देशांतील भाषा, हवामान, सीमाशुल्क प्रक्रिया आणि वाहतूक नियमांचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना आला. चीनमधील उजव्या बाजूने वाहन चालविण्याच्या पद्धतीमुळे काही आव्हाने निर्माण झाली होती. मात्र आत्मविश्वास, नियोजन आणि अनुभवाच्या बळावर त्यांनी ती यशस्वीपणे पार केली. या मोहिमेत सौ. सोनी बजाज यांनीही सुमारे २,००० किलोमीटर वाहन चालवत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

सत्कारप्रसंगी भास्कर आबा दानवे म्हणाले, "जालना शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानाने पोहोचविणारे हे यश संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे. बजाज दाम्पत्याची जिद्द, चिकाटी आणि नियोजन अनेक युवकांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देणारे आहे."

यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, नगरसेवक अर्जुन गेही, राजेश जोशी, नागेश अंभोरे तसेच बजाज कुटुंबीय उपस्थित होते.

# संत श्री गजानन महाराज पालखीचे परभणीत उत्साहात स्वागत; आरोग्यसेवेचा मायेचा हात

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी** : शेगावहून पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी निघालेल्या संत श्री गजानन महाराजांच्या पायी पालखीचे परभणी शहरात भक्तिमय वातावरणात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

दत्तधाम येथे परभणी महानगरपालिकेच्यावतीने पालखीचे स्वागत करण्यात आले. यावेळी महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने स्वच्छता, आरोग्य सेवा आणि वारकऱ्यांच्या सोयीसुविधांसाठी विशेष नियोजन केले होते.

दत्तधाम ते वसमत रोड, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर, मोंढा आणि रोकडे हनुमान मंदिर परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. पालखी मार्गावर स्वच्छता



कर्मचारी व घंटागाड्यांची व्यवस्था करण्यात आली होती.

महानगरपालिका आरोग्य विभागाच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधे व वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच पालखी मार्गावर सहा आरोग्य पथके, पुरेसा औषधसाठा आणि १०८ रुग्णवाहिका सेवा सज्ज ठेवण्यात आली होती.

शिवरामनगर येथील संत कद्रूबाई मळा येथे पालखीच्या दुपारच्या विसाव्यादरम्यानही महानगरपालिकेने स्वच्छता आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या.

यावेळी उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे उपस्थित होते. या प्रसंगी सहाय्यक आयुक्त गजानन जाधव, माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार जाधव, रमेश चव्हाण, उमेश जाधव, डॉ. साबिया खान, डॉ. स्वाती आडे, डॉ. सना अमराह, दत्तात्रेय हाके, निलेश जोगदंड, अंकिता घनघाव, बालाजी भरकड, गणेश सोलके तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालखी सोहळा स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरणात पार पडावा यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सर्व विभागांना दक्ष राहण्याच्या सूचना देत वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या.

# भाजपा हिंगोली तालुका ग्रामीण मंडळाच्या सरचिटणीसपदी उद्धव घ्यार यांची निवड

**हिंगोली** : भारतीय जनता पार्टीच्या हिंगोली जिल्हा आढावा बैठकीसह जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन रविवार, दि. ५ जुलै रोजी हिंगोली येथील रामाकृष्णा लॉज येथे करण्यात आले. या बैठकीत साटंबा येथील भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते उद्धवराव घ्यार यांची भाजपा हिंगोली तालुका ग्रामीण मंडळाच्या सरचिटणीसपदी निवड करण्यात आली.



निवडीचे अधिकृत पत्र भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा हिंगोली जिल्हा प्रभारी संजय कोडगे, राज्यसभा खासदार रामरावजी वडकुते, भाजपा जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजानन घुगे, आमदार तानाजी मुटकुळे पूर्व जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे हिंगोली तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष माणिक लोडे यांच्या हस्ते उद्धव घ्यार यांना प्रदान करण्यात आले.

यावेळी भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष शशिकांत वडकुते जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, संजय कावडे अतिश दांडेगावकर महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष उज्ज्वला तांबाळे भाजपा जिल्हा महामंत्री हिंगोली सुनीता मुळे शहराध्यक्ष रजनीश पुरोहित संदीप वाकडे यांच्यासह अनेक भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

उद्धव घ्यार यांच्या निवडीबद्दल भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# भर पावसातही मुंबईतील आरक्षण उपवर्गीकरणविरोधी महामोर्चात भीम अनुयायांची दमदार उपस्थिती

## देवळेगव्हाण येथील बौद्ध बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग; संविधान संरक्षणाचा निर्धार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य महामोर्चात देवळेगव्हाण येथील भीम अनुयायी बौद्ध बांधवांनी मुसळधार पावसाची तमा न बाळगता उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भर पावसातही मोठ्या संख्येने उपस्थित राहत त्यांनी सामाजिक न्याय, संविधानाचे संरक्षण आणि आरक्षणाच्या हक्कांप्रती आपली बांधिलकी अधोरेखित केली.

महामोर्चाचे नेतृत्व संजय दाभाडे यांनी केले. त्यांच्यासोबत विजय हिवाळे व मनोहर गाडेकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. यावेळी अनेक भीमसैनिकांनी घोषणाबाजी करत आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात आपली भूमिका ठामपणे मांडली.



मोर्चात प्रकाश खरात (अध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा, शाखा क्र. ३, संघर्ष नगर, चांदोली, अंधेरी, मुंबई), उत्तम ढगे, भाऊसाहेब पटेकर, संदीप जोगदंड, गमरे गुरुजी, अनिरुद्ध गवळी, ज्ञानदेव वाहुळ, सिद्धार्थ मस्के तसेच पत्रकार खैरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# दि.औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीत प्रभाकर (आबा)काळे यांच्या विजयानिमित्त सोयगावात जल्लोष; सत्कार करुन शुभेच्छा

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.५ जुलै** : दि.औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,छत्रपती संभाजीनगर संचालक मंडळाच्या निवडणुकीत महायुतीच्या शेतकरी विकास पॅनलने घवघवीत यश संपादन करत एकहाती सत्ता मिळविली. तसेच सोयगाव येथील शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा)काळे यांनी प्रचंड मताधिक्याने विजय मिळवल्याबद्दल सोयगाव येथे तालुका शिवसेनेच्या वतीने उत्साहात विजयोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.विजयी संचालक प्रभाकर (आबा)काळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.




यावेळी शिवसेना शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे, न. प.तील शिवसेना गटनेते अक्षय काळे,किशोर मापारी, हर्षल काळे,गजानन कुडके,दिपक पगारे,संदीप सुरडकर, लतिफ शहा,मोतीराम पंडीत,कदीर शहा,रमेश गव्हांडे, नारायण घनघाव,जिवन पाटील,फिरोज पठाण,हर्षल देशमुख,ॲड. योगेश पाटील,संदीप चौधरी,सुनिल निकम, रविंद्र काळे,विलास बोर्डे,विजय काळे,भगवान वाघ,अमोल मापारी,रमेश वामने,अमोल निकम,समाधान काळे,सलमान पठाण,साई पाटील,गजानन ढगे,आबा कोळी,निवृत्ती गव्हांडे,रंगनाथ पाटील,कृष्णा जुनघरे,धनराज औरंगे, स्वप्नील काळे,प्रकाश देसाई,विष्णू इंगळे,अरुण सोहनी, दिगंबर वाघ आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911